नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील दिंडोशी, मुंबई येथील न्यायालयीन इमारतीमधील अग्नीशमन यंत्रणेच्या दुरुस्तीच्या खर्चास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण १०१६/८०७/प्र.क्र.१५२/कार्या.११
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २५/१०/२०१७

वाचा : १. उप प्रबंधक B(W) शाखा, उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र.B(W)६०५४/१९८६/२६९२, दि.६/१०/२०१६
२. नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र.देखभाल विभाग/पी.जे./ १८५०/२०१६, दि.२८/७/२०१६

प्रस्तावना :

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्रमांक २१६/२०१० मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशांस अनुलक्षून राज्यातील सर्व न्यायालयीन इमारतीचे फायर ऑडीट करण्यात येत असून अग्नीशमन यंत्रणा उभारणी / अग्नीप्रतिबंधक उपाययोजना करण्यात येत आहेत. या अनुषंगाने नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील दिंडोशी, मुंबई येथील न्यायालयीन इमारतीमध्ये अग्नीशमन यंत्रणेच्या दुरुस्तीचा प्रस्ताव नगर दिवाणी व सत्र न्यायालय मुंबई यांनी शासनास सादर केला आहे. उप मुख्य अग्निशम अधिकारी, मुंबई अग्निशमन दल, मुंबई यांनी सुचित केलेल्या उपाययोजनांच्या अनुषंगाने सन २०१६-२०१७ च्या दरसूचीवरील अंदाजपत्रके संबंधित उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी तयार केली असून संबंधित कार्यकारी अभियंता यांनी साक्षांकित केली आहेत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई व वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेस सहमती दर्शविली आहे. त्यानुसार नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील दिंडोशी, मुंबई येथील न्यायालयीन इमारतीमधील अग्नीशमन यंत्रणेच्या दुरुस्तीच्या खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील दिंडोशी, मुंबई येथील न्यायालयीन इमारतीमधील अग्नीशमन यंत्रणेच्या दुरुस्तीसाठी सेंटेज चार्जेस वगळून येणाऱ्या रु.४,८८,३७९/- (अक्षरी रुपये चार लाख अठ्ठयाऐंशी हजार तीनशे एकोणऐंशी फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील दिंडोशी, मुंबई येथील न्यायालयीन इमारतीमध्ये अग्नीशमन यंत्रणेच्या दुरुस्तीसाठी होणारा खर्च "मागणी क्र.जे-१, २०१४ -न्यायदान १०५- दिवाणी व सत्र न्यायालये (०१) मुंबई शहर दिवाणी व सत्र न्यायाधीश (०१ (०१) मुंबई शहर दिवाणी व सत्र न्यायाधीश (२०१४ ०१६३) १३ कार्यालयीन खर्च" या लेखाशीर्षाखालील सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर कामाची निविदा मागविण्यापूर्वी स्थानिक अग्निशमन अधिकारी यांनी निश्चित केलेल्या उपाययोजनांमधील कामे असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी प्रधान न्यायाधीश, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुबई यांची राहील. प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करुन ई-निविदा प्रक्रीया सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राबविण्यात यावी व या प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने इतर अनुषंगिक कार्यवाही पूर्ण करावी. स्थानिक अग्नीशमन अधिकारी यांनी सुचविलेल्या उपाययोजनांचे अनुपालन होईल याबाबत प्रधान न्यायाधीश, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुबई यांनी दक्षता घ्यावी.

हा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१३/इमा.२ दि.८/३/२०१७ आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २९७/ व्यय ५, दि.२१/४/२०१७ अन्वये व त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१०२५११५१०३४८१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anita Dipak Ripote

Digitally signed by Anita Dipak Ripote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=28bdb8b03e204307a26238ccccb76a2c1ea a9ed4838f450b88dfb9ca9793b4b5, serialNumber=25e18795e96deb90b1428c41cb6c87 bc90c3bb1f0ea059da3e0a07a3bc00c6c8, cn=Anita Dipak Ripote
Date: 2017.10.25 11:37:33 +05'30'

(अनिता रिपोटे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. प्रबंधक (निरिक्षणे १),उच्च न्यायालय, मुंबई,
२. प्रधान न्यायाधीश, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई,
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई,
४. महालेखापाल (लेखा परिक्षा) मुंबई,
५. संचालक, महाराष्ट्र अग्नीशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र अग्नीशमन सेवा अकादमी, विद्यानगर, सांताक्रुझ, मुंबई ४०० ९८,
६. वित्त विभाग (व्यय ५), मंत्रालय, मुंबई,
७. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत २), मंत्रालय, मुंबई,
८. विधि व न्याय विभाग (कार्या.१३ व २३), मंत्रालय, मुंबई,
९. निवडनस्ती (कार्या.११).